सुराज्य

| वर्ष ९ | अंक १५६ | शुक्रवार | २० | नोव्हेंबर २००९ | पाने ४ | किंमत १ रूपया |
|---|---|---|---|---|---|---|

# डिसेंबरमध्ये मुंबईत औद्योगीक व्यापार महामेळावा

**मुंबई दि.१९ (प्रतिनिधी)**

हॅनोवर मिलानो फेअर्स इंडिया या कंपनीने यंदा मुंबईत 'मेगा इंडस्ट्रियल ट्रेड फेअर'अर्थात औद्योगिक व्यापार महामेळाव्याचे आयोजन केले आहे.दि.१० ते १३ डिसेंबर दरम्यान बॉम्बे एक्झिबिशन सेंटर, पश्चिम द्रूतगती महामार्ग, गोरेगाव(पू) येथे आयोजित या महामेळाव्यात (मटेरियल्स,हँडलिंग अॅण्ड लॉजिस्टिक्स), (मोशन,ड्राईव्ह अॅण्ड ऑटोमेशन), इंडस्ट्रियल ऑटोमेशन इंडिया (प्रोसेस अॅण्ड प्रोडक्शन ऑटोमेशन अॅण्ड इंडस्ट्रियल बिल्डींग ऑटोमेशन), एनर्जी इंडिया (सोल्यूशन्स फॉर एनर्जी एफिशिएन्सी, रिन्युएबल एनर्जी अॅण्ड कॅप्टीव्ह पॉवर प्लान्टस्) ही चार प्रमुख प्रदर्शने भरवली जातील. अत्याधुनिक तंत्रज्ञान हे या महामेळाव्याचं प्रमुख आकर्षण आहे.

फलुईड पॉवर सोसायटी ऑफ इंडियातर्फे या महामेळाव्यात ऑटोमेशन किऑस्क उभारण्यात येणार आहे. फ्लूईड पॉवर सोसायटी ऑफ इंडियाच्या सदस्य औद्योगिक संस्थांनी या महामेळाव्यात ऑटोमेशन तंत्रज्ञान आणि अॅप्लिकेशन ट्रेनिंग संदर्भात माहिती देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. महामेळाव्यात सहभागी होणाऱ्यांना तज्ज्ञांशी थेट संपर्क साधता येणार आहे.ऑटोमेशन किऑस्क ही एक अनोखी संकल्पना असून यापूर्वी जगताप जगात कुठेही या संकल्पनेचा वापर करण्यात आलेला नाही. याशिवाय लेन्झ कंपनींन तयार केलेला ८४०० फ्रिक्केन्सीचा नवीन इन्व्हर्टर, ओमाल कंपनीचे अॅक्चूएटर्स आणि व्हाल्व्स्, पीटर्स इंडू प्रोडक्ट कंपनीचे न्यूमॅटिक, हायड्रॉलिक, सेन्सर अॅण्ड ऑटोमेशन प्रोडक्ट, केबल अॅडाप्टर, सेन्सर कनेक्टर (एम-८/एम१२) कनेक्टर मोल्डेड, सेन्सर कनेक्टर (एम८/एम१२) फील्ड, अॅटॅचेबल, इलेक्ट्रॉनिक प्रेशर स्विच इ.स्टॅबिलस, सेन्टॉर्क, अॅटॉस स्पा कंपनीचे अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित इलेक्ट्रोहायड्रॉलिक्स आदींचा या महामेळाव्यात समावेश असेल. पुरवठादार आणि ग्राहक कंपन्या या दोहोंनाही उद्योग जगतातल्या नवनवीन ट्रेंडस्च्या माहितीची देवाणघेवाण करण्याच्या दृष्टीने हा मेळावा अत्यंत महत्वपूर्ण ठरणार आहे.